कल्याण तक्रार प्रकरण/क्र. 126, 127

क्र. महसुल/कक्ष.१/टे.७/एलबीपी/कावि १/२०००
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
दिनांक :-३१/ ७ / २०००.

वाचले :- १) आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण यांचे दिनांक दिनांक-१) २९/१२/९९, २)१३/१/२०००

२) शासनाचे महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.एलएनडी/१०८३/२७०३/सीआर/१९०९/ज-५/दिनांक ४/२/८३.

३) शासनाचे नागर विकास विभागाकडील परिपत्रक क्र पीपीएस/३६९१/२४५३/२५४/९१/युडी.-११ दिनांक ५/१०/९३

आदेश :-

ज्या अर्थि, आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगर पालिका यांनी खाली नमूद केलेली विविध आरक्षणाखाली जमिन कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत प्रस्तावनेतील अनु. क्र. १ चे पत्रान्वये विनंती केली आहे.

जागेचा तपशिल

| गावाचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आरक्षणाचा तपशिल | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| आसदे गोलीवली | ३० (जूना-१४२) | ०-८२-० | १) हायस्कुल | ३७६२-०० |
| | | | २) प्राथमिक शाळा | १०२९-०० |
| | | | ३) १८ मि.विकास योजनेचा रस्ता | १२६०-०० |
| | | | एकूण | ६०५१-०० |
| | ३१ (जूना-१८०) | ०-९८-० | १) ३० मि.विकास योजनेचा रस्ता | ११२०-०० |
| | | | एकूण | ७१७१-०० |

त्याअर्थि मी, मुकेश खुल्लर जिल्हाधिकारी ठाणे मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मौजे-आसदेगोलीवली, ता. कल्याण, स.नं-३० (जूना-१४२),चौ.मी. तसेच स.नं-३१ (जूना १८०) पैकी क्षेत्र ११२०-०० चौ.मी. असे एकूण-७१७१-००चौ.मी. क्षेत्रांचा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेचे सुधारीत विकास आराखडयातिल आरक्षणाचे प्रयोजनासाठी कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडे महसुल मुक्त किंमतीने व विनामुल्य खालील शर्ती व अटीस अधिन राहून जमिनीचा ताबा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडे देण्यांचे आदेश देत आहे.

१) प्रदान करणेंत आलेली जमिन ही कल्याण-डोंबिवली महानगर पालिका यांना आवश्यक असलेल्या कालावधी पर्यंतच राहील. जमिनीची आवश्यकता संपताच ती शासनाच्या ताब्यात देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२) प्रदान करण्यांत आलेली जमिन ही ज्या कारणासाठी हस्तांतरण करणेंत आली आहे त्याच कारणासाठी वापर करावयाचा आहे. त्या व्यतिरिक्त वापर करावयाचा झाल्यास जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय वापरात बदल करता येणार नाही.

३) प्रदान करण्यांत आलेली जमिन अन्य खाजगी व्यक्ति/संस्था, अन्य सरकारी विभागास जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण अथवा विक्री करता येणार नाही.

४) प्रदान करण्यांत आलेल्या जमिनीचा ताबा घेतले नंतर जागेवर अतिक्रमण होवून न देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहिल. तसेच सदर जागेवर अतिक्रमण झाल्यास ती दूर करण्याची जबाबदारी कल्याण - डोंबिवली महानगरपालिका यांचेवर राहील.

५) सदर जागेचा आगाऊ ताबा शासनाचे मान्यतेस अधिन राहून देण्यांत येत आहे. शासनाने जागा मंजूरीबाबतचा प्रस्ताव अमान्य केल्यास प्रदान केलेल्या जमिनीचा ताबा विना मोबदला शासनास परत करण्यांची जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेवर राहील. यासंबंधी प्राप्त झालेला शासन आदेश संबंधीतांवर बंधनकारक राहील.